महाराष्ट्र शासन

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com


क्र.तंशिप्र-१२२०/प्र.क्र.०२०/सीईटी/२०७

दिनांक -२५/०१/२०२१.

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता तंत्रशिक्षणांतर्गत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या प्रवेश फेरीनंतर प्रवेश निश्चित करताना विद्यार्थी/उमेदवार यांनी घ्यावयाची काळजी**

## <u>महत्वाची सुचना</u>

१. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत दिनांक २०/०१/२०२१ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या सूचनेनुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता प्रवेश घेणाऱ्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज करताना ज्या उमेदवारांनी EWS, NCL आणि CVC/TVC प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी पावती सादर केली होती अशा सर्व उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत त्या-त्या संबंधीत प्रवर्गातून जागा वाटप करण्यात येत आहे. अशा उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून ज्या प्रवर्गातून जागा वाटप करण्यात येईल त्या-त्या प्रवर्गातून संस्थेत प्रवेश देण्यात येईल. सदरचा प्रवेश हा तात्पूरता प्रवेश म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. संबंधीत अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संपण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत संबंधीत उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करण्यात येईल.

२. ज्या उमेदवारांकडे मुळ प्रमाणपत्रे प्राप्त झालेली आहेत अशा उमेदवारांनी त्यांच्या लॉगीनमधून कागदपत्रे अपलोड करावी जेणेकरुन ई- पडताळणी केंद्र छाणणी करुन पात्र उमेदवार संस्थेत प्रवेश निश्चित करतील. तथापी ज्या उमेदवारांकडे मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध झालेली नाहीत असे उमेदवार शैक्षणिक पात्रतेची निकष पुर्ण करीत असतील तर संस्थेने त्यांना तात्पुरता प्रवेश द्यावा व त्याची नोंद संस्थेने त्यांच्या लॉगीन मधून अपलोड करावी. परंतू अशा उमेदवारांनी दुसऱ्या फेरीच्या अंतिम दिनांकाच्या आत मुळ प्रमाणपत्रे अपलोड केली नाहीत तर अशा उमेदवारांचा तात्पुरता प्रवेश हा आपोआप प्रणालीद्वारे रद्द करण्यात येईल असे संबधित उमेदवारांना अवगत करावे.

३. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत वरील सुचना व यासंदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. ज्या संस्था सदर सुचनांचे पालन करणार नाही याला सर्वस्वी संस्था व संस्थाप्रमुख जबाबदार राहतील.

**सही/-**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**